**विशेष दिवाणी मुकदमा क्र.८/२०१७ मधील निशाणी क्र.९५ वरील आदेश**

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.५ आणि ६ यांनी त्यांचेविरुद्ध पारीत झालेला 'एकतर्फा' चा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील निशाणी क्र.१०२ कडे वादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले. वादींतर्फे व प्रतिवादींतर्फे युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र.५ आणि ६ यांनी असे कथन केले की, ते उद्योगधंद्यानिमित्त परगावी असल्याने तसेच आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने ते दाव्याकामी मुदतीत हजर होवू शकले नाहीत. म्हणून त्यांनी 'एकतर्फा' चा आदेश रद्द होवून मिळण्याची विनंती केली.

४. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतली. वादींनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.५ याला दिनांक २४/०३/२०१७ रोजी व प्रतिवादी क्र. ६ यांना दिनांक ११/०९/२०१७ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झालेली आहे. दाव्याचे समन्स मिळल्यापासून प्रस्तुतचा अर्ज दाखल करेपर्यंत प्रतिवादी क्र. ५ याला १४५५ व प्रतिवादी क्र.६ याला १२८४ दिवसाची म्हणजे सुमारे साडेतीन वर्षे होवून गेलेली आहेत. प्रतिवादी जाणूनबुजून दाव्यात हजर झालेले नव्हते. प्रतिवादींना दावा मिळकतीच्या व्यवहाराची संपूर्ण मोबदला रक्कम देण्यात आलेली आहे. वादीने दावा मिळकत खरेदी करणेकामी जनता सहकारी बँकेचे कर्ज काढले होते. सदर रकमेवरील व्याज कोरोना संक्रमणाच्या कालावधीत भरता न आल्याने वादीची बँकेची जप्तीची नोटीस आलेली आहे. प्रतिवादीच्या बेकायदेशीर वागण्यामुळे वादीला आर्थिक नुकसान व मानसिक त्रास होत आहे.

त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. प्रस्तूत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दिनांक २७.०६.२०१७ रोजी व प्रतिवादी क्र.६ विरुद्ध दिनांक ०४/११/२०१७ 'एकतर्फा' चा आदेश झाला असून दिनांक १९.०३.२०२१ रोजी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तूतचा विचाराधीन अर्ज दिनांक १९.०३.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. दावा एकतर्फा चौकशीसाठी प्रलंबीत होता. वादी क्र. २ तर्फे निशाणी क्र. ६६ कडे पुराव्याचे शपथपत्र देखील दाखल केलेले आहे परंतू अद्याप त्याचा उलटतपास झालेला नाही. याकारणाने प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना बाजू मांडण्याची संधी दिल्यास वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. झालेल्या विलंबाबाबत वादींना प्रतिवादी क्र. ५ आणि ६ कडून योग्य तो खर्च देणे आवश्यक आहे. म्हणून मी पुढील आदेश पारित करतो.

## <u>आ दे श</u>

१. निशाणी क्र. ९५ कडील अर्ज ३,०००/– रुपये (तीन हजार रुपये फक्त) खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ५ आणि ६ विरुध्द पारित केलेला 'एकतर्फा' आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.५ आणि ६ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत वादींना द्यावी अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यात येईल्.

ठिकाण — वडूज
दिनांक – १७.०९.२०२१

(के. सी. माने)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज